SAMPLE CONTENT

# मराठी कुमारभारती

नवीन अभ्यासक्रमावर आधारित



इयत्ता दहावी

(मराठी माध्यम)

Target Publications Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
यांच्याद्वारे नियोजित नवीन अभ्यासक्रमावर आधारित

## इयत्ता दहावी

# मराठी कुमारभारती

**ठळक वैशिष्ट्ये:**

- नवीन पाठ्यपुस्तकावर आधारित.
- नवीन कृतिपत्रिका प्रारूपावर आधारित.
- सहज, सोपी लेखनशैली व सुटसुटीत मांडणी.
- आदर्श उत्तरांसहित सरावासाठी भरपूर कृती.
- भाषाभ्यास व लेखनकौशल्य यांवर आधारित वैविध्यपूर्ण कृतींचा अंतर्भाव.
- सखोल अभ्यासासाठी स्वतंत्र व्याकरण विभाग अंतर्भूत.
- स्वयंमूल्यमापनासाठी उपयुक्त.
- सरावासाठी नमुना कृतिपत्रिका समाविष्ट.

या पुस्तकात समाविष्ट **Q. R. Code** स्मार्टफोनद्वारे स्कॅन करून कवितांचे भावार्थ कथन करणारे व्हिडिओज् पाहता येतील. नवीन अभ्यासक्रमाची रूपरेषा व कवितांचे सुलभ आकलन होण्यासाठी हे व्हिडिओज् विद्यार्थ्यांना फायदेशीर ठरतील.

SAMPLE CONTENT

Printed at: **India Printing Works,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

P.O. No. 112750

**TEID: 12505_JUP**

# प्रस्तावना

नमस्कार, विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो!

दहावीचं वर्ष म्हणजे आपल्या शैक्षणिक जीवनातला महत्त्वाचा टप्पा! या वर्षी आपल्याला शासनाने निर्धारित केलेला ज्ञानरचनाधारित नवीन अभ्यासक्रम शिकायचा आहे. या नव्या अभ्यासक्रमाशी ओळख करून देण्यासाठी आणि हसतखेळत भाषा आत्मसात करण्यासाठी '**टार्गेट प्रकाशनाचे मराठी कुमारभारती इयत्ता दहावी**' हे पुस्तक प्रकाशित करताना आम्हांला आनंद होत आहे.

मुलांनो, शासनाने निर्धारित केलेला हा नवा अभ्यासक्रम भाषेची रुची वाढवणारा व अभ्यासाची कला शिकवणारा आहे. 'घोका आणि ओका' या पाठांतर पद्धतीपेक्षा वेगळा असा हा अभ्यासक्रम भाषिक कौशल्यांचा विकास करणारा आहे, यामुळे भाषाज्ञान हे फक्त प्रश्नोत्तरांपुरते मर्यादित न राहता आकलन शक्ती व सर्जनशीलता या क्षमतांचा विकास करणारे ठरेल.

या अभ्यासक्रमाचे बारकाईने विश्लेषण करून आम्ही हे पुस्तक विकसित केले आहे. पाठाच्या मांडणीच्या क्रमानुसार कृतींची मांडणी हे टार्गेटच्या पुस्तकांचे वेगळेपण आहे. प्रत्येक कृतींचा क्रम पाठाच्या मांडणीच्या क्रमानुसार ठेवलेला आहे, त्यामुळे कृती सोडवताना पाठातील घटनाक्रम पुन्हा एकवार स्पष्ट होऊन विषयाचे ज्ञान पक्के होते. नवीन कृतिपत्रिका प्रारूपावर आधारित कृतींची आदर्श उत्तरांसहित मांडणी यात केली आहे. प्रत्येक प्रकरणाची परिच्छेदानुसार विभागणी करून त्यात आकृतिबंध, ओघतक्ते, चौकटी अशा वैविध्यपूर्ण आकलन कृती, मुबलक व्याकरण कृती, स्वमत यांचा समावेश करण्यात आला आहे. शक्य तिथे कवितांची पद्यांशात विभागणी करून विविध आकलन कृतींसमवेत काव्यसौंदर्य कृती, काव्यपंक्तींचे रसग्रहण असा कृतिपत्रिकेच्या आराखड्यानुसार मुबलक प्रश्नोत्तरांचा अंतर्भाव केला आहे. पाठ व कविता दोन्हींसाठी 'भाषाभ्यास' या शीर्षकाखाली व्याकरण घटकांवर आधारित कृती व भाषिक घटकांवर आधारित कृतींचा समावेश केला आहे. अपठित गद्य आकलनाचा सराव व्हावा यासाठी पाठ्यपुस्तकातील उतारे व पाठ्येतर उतारे दिले आहेत. सखोल अभ्यासासाठी स्वतंत्र व्याकरण विभाग व लेखनकौशल्य विभाग अंतर्भूत केला आहे.

'सरावानेच सिद्धी प्राप्त होते', असे म्हणतात. म्हणूनच परीक्षेच्या दृष्टीने आपली तयारी जोखण्यासाठी दोन नमुना कृतिपत्रिकांचा समावेश केला आहे. विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी कवितांच्या भावार्थ कथनाचे व्हिडिओज् **Q. R. Code** मार्फत दिले आहेत. भरपूर सराव, सुटसुटीत मांडणी, आत्मसात करण्यास सोपी व ओघवती लेखनशैली यांमुळे हे पुस्तक तुमच्या पसंतीस उतरेल असा आम्हांला विश्वास आहे.

प्रयत्नांती परमेश्वर! चला ... नियोजनबद्ध अभ्यासाला सुरुवात करूया, नवीन अभ्यासक्रमाला आत्मविश्वासाने सामोरे जाऊया, तुमच्या प्रयत्नांत आम्ही सदैव तुमच्या सोबतच आहोत.

हे पुस्तक परिपूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरता आपला अभिप्राय mail@targetpublications.org या इमेल पत्त्यावर पाठवावा ही नम्र विनंती.

**धन्यवाद!**

**ज्ञानार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती:** प्रथम

**Disclaimer**

This reference book is transformative work based on textual contents published by Bureau of Textbook. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents, the Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

SAMPLE CONTENT

**कृतिपत्रिका आराखडा (गुणविभागणीसह)**
**मराठी – प्रथम भाषा (कुमारभारती)**
**इयत्ता दहावी**

**एकूण गुण: १००**

**घटकनिहाय गुणविभागणी**

| अनु. क्र | विभाग | गुण | विकल्प गुण |
|---|---|---|---|
| १ | गद्य | २४ | |
| २ | पद्य | २० | |
| ३ | स्थूलवाचन | ६ | ३ |
| ४ | भाषाभ्यास | २० | |
| ५ | उपयोजित लेखन | ३० | १३ |
| | एकूण गुण | १०० | ११६ |

**कृतिपत्रिका आराखडा**

**विभाग १ : गद्य** **एकूण गुण २४**

**(अ) १ पठित उतारा**
**(आ) १ पठित उतारा**
**(इ) १ अपठित उतारा**
(शब्दसंख्या १३० ते १५०) **प्रत्येकी ८ गुण**

**०८ गुणांसाठी कृतिनिहाय विभागणी:**

१ आकलन कृती – २ गुण
२ आकलन कृती – २ गुण
३ व्याकरण कृती – २ गुण
दिलेल्या परिच्छेदात आलेल्या इयत्ता पहिली ते इयत्ता नववीच्या व्याकरण घटकांवर आधारित असणाऱ्या कृती अपेक्षित (सर्व घटकांवर आधारित कृती विकल्पाने देणे आवश्यक.)
४ स्वमत – २ गुण

**विभाग २ : पद्य** **एकूण गुण २०**

**(अ) १ पठित पद्य**
**(आ) १ पठित पद्य** **प्रत्येकी ८ गुण**

**('अ' व 'आ' या दोन्ही घटकांसाठी पाठ्यपुस्तकातील प्रत्येकी एक कविता कृतिपत्रिकेत दिली जाईल.)**

**८ गुणांसाठी कृतिनिहाय गुणविभागणी:**

१ आकलन कृती – २ गुण
२ आकलन कृती – २ गुण
३ काव्यसौंदर्य कृती – ४ गुण
१. विचारसौंदर्य
२. भावसौंदर्य
३. अर्थसौंदर्य
**(या ३ घटकांपैकी कोणत्याही दोन घटकांवर २ कृती अपेक्षित.)** **२/२ गुणांच्या दोन कृती**

**(इ) काव्यपंक्तींचे रसग्रहण: ४ गुण**
**पाठ्यपुस्तकात समाविष्ट असलेल्या पद्यांपैकी कोणत्याही एका पद्यातील रसग्रहणास अनुकूल अशा दोन ओळी कृतिपत्रिकेत देणे.**

SAMPLE CONTENT

* **दिलेल्या काव्यपंक्तींचे रसग्रहण करणे.**

**विभाग ३ : स्थूलवाचन** **एकूण गुण ६**

**प्रत्येकी ३/३ गुणांच्या २ कृती**

(स्वमत व अभिव्यक्तीवर आधारित कृती)

(पाठाचा आशय, शालाबाह्य जीवनाशी सांगड घालणारा आशय, मूल्य, जीवनकौशल्य यांवर आधारित ३ कृती देण्यात येतील व त्यांपैकी २ सोडवणे अपेक्षित.)

**विभाग ४ : भाषाभ्यास** **एकूण गुण २०**

**(अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती** **१० गुण**

(१) समास – अव्ययीभाव, विभक्ती तत्पुरुष, द्वंद्व, द्विगू – २ गुण

(२) अलंकार – रूपक, व्यतिरेक, दृष्टांत, चेतनगुणोक्ती – २ गुण

(३) वृत्त – वृत्त ओळखणे / गण पाडणे / लघू गुरु क्रम देणे
भुजंगप्रयात, मालिनी, वसंततिलका – १ गुण

(४) शब्दसिद्धी – शब्द – प्रत्ययघटित, उपसर्गघटित, अभ्यस्त – २ गुण

(५) सामान्यरूप – १ गुण

(६) वाक्प्रचार – २ गुण

**(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती** **१० गुण**

(भाषासौंदर्य/ भाषिक समृद्धी)

**(१) शब्दसंपत्ती** – ४ गुण

(१) समानार्थी शब्द
(२) विरुद्धार्थी शब्द
(३) शब्दसमूहांबद्दल एक शब्द
(४) एका शब्दाचे अनेक अर्थ/अर्थछटा
(५) शब्दातील अक्षरापासून शब्द बनवा.

(प्रत्येकी १/२ गुणांची कृती अपेक्षित)
शब्दसंपत्तीच्या घटकांपैकी कोणत्याही ४ घटकांवर प्रत्येकी १/२ गुणांची कृती.

**शब्दसंपत्तीशी संबंधित वरील घटकांपेक्षा वेगळी कृती कृतिपत्रिकेत विचारली जाऊ शकते.**

**(२) लेखननियमांनुसार लेखन** – २ गुण

(१) अचूक शब्द ओळखा.
(२) वाक्य लेखननियमांनुसार लिहा.

(प्रत्येक अचूक शब्दाला १/२ गुण, वाक्यातील चुकीच्या शब्दाच्या दुरुस्तीसाठी प्रत्येकी १/२ गुण)

**(३) विरामचिन्हे** – २ गुण

(१) योग्य विरामचिन्हे वापरा.

(२) चुकीची विरामचिन्हे बदला.

**(४) पारिभाषिक शब्द/प्रचलित मराठीतील शब्द** – ०१ गुण

(गद्य, पद्य या दोन्ही विभागातील घटकांवर आधारित) (प्रत्येकी १/२ गुणांसाठी २ कृती)

SAMPLE CONTENT

**(५) अकारविल्हे/ भाषिक खेळ** – १ गुण

(किमान ४ वर्ण अकारविल्हे लावणे)

[टीप – विभाग ४ व्याकरण घटकांतर्गत दिलेल्या कृती या नमुन्यादाखल आहेत. सृजनशील कृतींची नावीन्यपूर्ण रचना करता येणे शक्य आहे.]

**विभाग ५ : उपयोजित लेखन** **एकूण गुण ३०**

**(अ) विभाग** **विकल्प गुण** **एकूण गुण १०**

१. पत्रलेखन – ५ गुण (अंतर्गत विकल्प २ पैकी १ पत्र सोडवणे) – ५ गुण

↓ ↓

औपचारिक (मागणी, विनंती) अनौपचारिक (कौटुंबिक)

२. सारांशलेखन – ५ गुण (१०० ते १२० शब्दांचा उतारा)

**(आ) विभाग** **विकल्प नाही** **एकूण गुण १२**

| | | |
|---|---|---|
| १. जाहिरातलेखन (५० ते ६० शब्द) | – ६ गुण | (३ घटकांपैकी कोणत्याही २ घटकांवर कृती विचारणे. दोन्हीही कृती सोडवणे अपेक्षित आहे.) |
| २. बातमी लेखन (५० ते ६० शब्द) | – ६ गुण | |
| ३. कथालेखन (८० ते १०० शब्द) | – ६ गुण | |

**(इ) लेखनकौशल्य** (८० ते १०० शब्द) **विकल्प गुण** **एकूण गुण ८**

(निबंध लेखन)

| | |
|---|---|
| १. प्रसंगलेखन | (३ घटकांपैकी कोणत्याही २ घटकांवर कृती विचारली जाईल. त्यांपैकी कोणतीही एक कृती सोडवणे अपेक्षित आहे.) |
| २. आत्मकथन | |
| ३. वैचारिक | |

[**संदर्भ**: महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे निर्मित मूल्यमापन आराखडा]

**[सूचना**: नवीन अभ्यासक्रमावर आधारित कृतिपत्रिकेच्या प्रारूपाचे सुयोग्य आकलन होण्याकरता शेजारील **Q. R. Code** स्कॅन करून व्हिडिओ पाहा. **]**

SAMPLE CONTENT

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | लेखक / लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | जय जय हे भारत देशा | मंगेश पाडगावकर | १ |
| २. | बोलतो मराठी... | डॉ.नीलिमा गुंडी | ४ |
| ३. | आजी: कुटुंबाचं आगळ | महेंद्र कदम | १५ |
| ४. | उत्तमलक्षण | संत रामदास | २७ |
| ५ | वसंतहृदय चैत्र | दुर्गा भागवत | ३३ |
| | बालसाहित्यिका – गिरिजा कीर (स्थूलवाचन) | डॉ.विजया वाड | ४९ |
| ६. | वस्तू | द. भा. धामणस्कर | ५३ |
| ७. | गवताचे पाते | वि.स.खांडेकर | ६० |
| ८. | वाट पाहताना | अरुणा ढेरे | ६७ |
| ९. | आश्वासक चित्र | नीरजा | ८१ |
| १०. | आप्पांचे पत्र | अरविंद जगताप | ८७ |
| | मनक्या पेरेन लागा (स्थूलवाचन) | वीरा राठोड | ९९ |
| ११. | गोष्ट अरुणिमाची | सुप्रिया खोत | १०२ |
| १२. | भरतवाक्य | मोरोपंत | १२१ |
| १३. | कर्ते सुधारक कर्वे | डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे | १२७ |
| १४. | काळे केस | ना.सी.फडके | १४० |
| १५. | खोद आणखी थोडेसे | आसावरी काकडे | १५१ |
| | वीरांगना (स्थूलवाचन) | | १५५ |
| १६. | आकाशी झेप घे रे | जगदीश खेबुडकर | १६१ |
| १७. | सोनाली | डॉ. वा. ग. पूर्णपात्रे | १६६ |
| १८. | निर्णय | डॉ. सुनील विभुते | १८७ |
| १९. | तू झालास मूक समाजाचा नायक | ज. वि. पवार | २०४ |

| क्र. | पाठाचे नाव | लेखक / लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| २०. | सर्व विश्वचि व्हावे सुखी | डॉ.यशवंत पाठक | २११ |
| | व्युत्पत्ती कोश (स्थूलवाचन) | | २२५ |
| | अपठित गद्य आकलन | | २२८ |
| | **व्याकरण विभाग** | | |
| १ | शब्दांच्या जाती | | २४० |
| २. | सामान्यरूप, विभक्ती प्रत्यय | | २४७ |
| ३. | काळ | | २५२ |
| ४. | वाक्याचे प्रकार | | २५५ |
| ५. | समास | | २५७ |
| ६. | अलंकार | | २६२ |
| ७. | वृत्तविचार | | २६५ |
| ८. | शब्दसिद्धी | | २६८ |
| ९. | लेखननियम | | २७१ |
| १०. | विरामचिन्हे | | २७५ |
| | **उपयोजित लेखन** | | |
| १. | पत्रलेखन | | २७७ |
| २. | सारांशलेखन | | २८७ |
| ३. | जाहिरात लेखन | | २९० |
| ४. | बातमीलेखन | | २९५ |
| ५. | कथालेखन | | २९९ |
| ६. | लेखन कौशल्य | | ३०३ |
| | नमुना कृतिपत्रिका – १ | | ३१६ |
| | नमुना कृतिपत्रिका – २ | | ३२६ |


**टीप: पाठाखाली दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.**

SAMPLE CONTENT

# १२ भरतवाक्य

– मोरोपंत

## कवी परिचय

मोरोपंत रामचंद्र पराडकर (१७२९ ते १७९४)

सुप्रसिद्ध पंडित कवी. काव्य, नाटक, व्याकरण, अलंकार, न्याय, वेदांत इत्यादी विषयांचा अभ्यास. वयाच्या २२-२३ व्या वर्षापासून काव्यलेखनास प्रारंभ. संस्कृतप्रचुर काव्यरचना, आलंकारिक साजशृंगार ल्यायलेली भाषा, वृत्तांचा यथायोग्य वापर हे पंडिती कवितेचे विशेष त्यांच्या काव्यात सापडतात. आपल्या संपूर्ण आयुष्यात त्यांनी विपुल काव्यरचना केली. सुमारे २६८ काव्यकृती त्यांच्या नावावर आहेत.

पंडिती कवितेसह त्यांच्या लेखणीने संस्कृत काव्यरचनाप्रकारांत संचार केला आहे. त्यांचे समग्र वाङ्मय 'कवीवर्य मोरोपंतांचे समग्र ग्रंथ: खंड १ ते १२' यांत संग्रहित करण्यात आले आहे.

## कवीचे साहित्यलेखन

**रचना:** आर्याभारत, केकावली, मंत्रभागवत, मंत्ररामायण, श्रीकृष्णविजय, हरिवंश.

## कवितेचा आशय

प्रस्तुत केका मोरोपंतांच्या 'केकावली'तून घेतल्या आहेत. 'केका' म्हणजे मोराचा टाहो आणि आवली म्हणजे पंक्ती. मोरोपंतांनी स्वत:स 'मोर' कल्पून, ईश्वराला मारलेल्या हाकांना, ईश्वराच्या केलेल्या आळवणीला 'केकावली' असे म्हटले गेले आहे.

प्रस्तुत केकांमधून कवी मोरोपंत सद्‌गृहस्थ किंवा सज्जन माणसांच्या संगतीचे व त्यांच्या विचारांच्या सान्निध्याचे महत्त्व सांगत आहेत. कोणत्याही लोभा-मोहाला बळी पडू नये, वृथा अभिमान सोडून भक्तिमार्ग आपलासा करावा, आणि भगवद्‌भक्तीत मन रमवावे, असा आशय या केकावलीतून व्यक्त होतो.

## कवितेचा भावार्थ

कवी मोरोपंत प्रस्तुत केकावलीत म्हणतात,

**सुसंगति सदा घडो .............. मन भवच्चरित्रीं जडो।।**

'सज्जनांची संगत सतत घडावी; सतत चांगल्या लोकांची वचने, बोल कानावर यावेत; बुद्‌धीवरील गंज, वाईट विचार, दोष निघून जावेत; ऐहिक सुखोपभोगांचा नेहमीच वीट यावा;' साधुसंतांच्या कोमल पदकमलांच्या ठायी आसरा मिळावा; त्यांनी दूर ढकलले तरी मनाने हट्टाने तेथेच अडून राहावे; (इतके करूनही) त्या सत्‌चरणांपासून विरह सहन करावा लागलाच तर मनाने खूप रडावे; (पण) नेहमी त्याने सत्पुरुषांच्या चरित्रांतच रमावे.

**न निश्चय कधीं ढळो ............... आत्मबोधें जळो।।**

मनाने कधीही डगमगू नये, निश्चय भंग पावू देऊ नये; दुष्ट लोकांनी निर्माण केलेल्या विघ्नांची बाधा दूर व्हावी; चित्त भजनापासून ढळू नये; सज्जनांनी सांगितलेल्या मार्गाकडे, भक्तिमार्गाकडे बुद्‌धी वळावी, हृदयाला आत्मतत्त्वाचे भान यावे, खोटा अभिमान (दंभ) साफ नाहीसा होवो; असे पावन झालेले, भक्तिमार्गाला लागलेले मन पुन्हा विषयांच्या लालसेने मलीन होऊ नये आणि आत्मज्ञानाने सारे पाप जळून भस्मसात व्हावे.

**मुखीं हरि ................ सदा सांवरी।।**

हे हरि (प्रभो), माझ्या मुखात तुझ्या नामावलीचा सदा वास होवो. तिच्यामुळे माझ्या संपूर्ण कामना सफल होतील. या दासावर हे (तिन्ही लोकांत वास करणाऱ्या) जगन्नाथा, तू कृपा कर. तुझ्या आश्रयाला येणाऱ्या लोकांवरही तुझी तशीच कृपादृष्टी बरसू दे.

## शब्दार्थ

| | |
|---|---|
| आत्मबोधे | आत्मज्ञानाने, आत्मबोधाने |
| कलंक | डाग, (येथे अर्थ - वाईट विचार) |
| कुजनविघ्नबाधा | दुर्जनाने आणलेल्या संकटाची पीडा |
| कुशलधामनामावली | भगवंताची विविध नावे |
| चळो | ढळणे |
| झडो | निघून जावो |
| दुराभिमान | वृथा / खोटा अभिमान |
| दुरित | पाप |
| निजाश्रितजना | तुझा आसरा/आश्रय मिळावा या इच्छेने आलेल्या लोकांना. |
| भवच्चरित्री | सत्पुरुषांच्या चरित्रांमध्ये |
| मती | बुद्‌धी |
| मावली | माऊली |
| वियोग | विरह |
| सकलकामना | संपूर्ण इच्छा |
| सुजनवाक्य | सज्जनांचे विचार |

SAMPLE CONTENT

| | |
|---|---|
| सदुक्तमार्गी | सज्जनांनी सांगितलेल्या मार्गाकडे, भक्तिमार्गाकडे, चांगल्या मार्गाकडे |
| सुसंगती | चांगली संगत, सज्जनांचा सहवास |
| स्वतत्त्व | (स्व) स्वत:चे तत्त्व, आत्मतत्त्व, वास्तविक स्वरूप |


### टीप

| | |
|---|---|
| जगत्रयनिवास | भगवंताला उद्देशून वापरलेले संबोधन |
| भरतवाक्य | नाटकातील शेवटचे वाक्य. प्रस्तुत वाक्य 'केकावली' ग्रंथाच्या उपसंहारातील शेवटची पद्यरचना आहे. |
| संदघ्रिकमळीं | सत् + अंघ्रि + कमळी. अंघ्रि म्हणजे पाय. सज्जनांच्या पदकमलाच्या ठिकाणी. |

### कृती १ – आकलन


***कृ.१. आकृती पूर्ण करा.**

i.




**उत्तर:** १. सुसंगती २. सुजनवाक्य
३. निश्चय ४. स्वतत्त्वाची जाणीव
५. आत्मबोध ६. मतीचा कलंक
७. विषयांची लालसा ८ कुजनविघ्नबाधा
९. दुराभिमान

ii.




**उत्तर:** १. सज्जनांच्या सहवासात सदा राहावे व त्यांचे चांगले बोल ऐकावे
२. भगवंताच्या नामस्मरणात मनाला गुंतवावे
३. मनाचा निश्चय डगमगू देऊ नये
४. सज्जनांनी सांगितलेल्या मार्गावरून चालावे

**कृ.२. चौकटी पूर्ण करा.**

i. मनाला सदा घडावी अशी गोष्ट – ☐
ii. मनाला याचा वीट यावा – ☐
iii. सतत कानावर पडावी अशी गोष्ट – ☐
iv. परमेश्वराच्या नामावलीने पूर्ण होणारी – ☐

**उत्तर:** i. सुसंगती
ii. विषयांचा / ऐहिक सुखोपभोगांचा
iii. सुजनवाक्य (सज्जनांचे बोल, वचने)
iv. सकल मनोकामना

**कृ.३. योग्य पर्याय निवडून विधान पुन्हा लिहा.**

*i. सदंघ्रिकमळीं दडो; म्हणजे _______
अ. कमळाच्या फुलात चित्त सदैव गुंतो.
ब. कमळातून मधुसेवन करणाऱ्या भुंग्याप्रमाणे सज्जनांच्या पायाशी मन गुंतो.
क. कमळाच्या व भ्रमराच्या सौंदर्यात मन गुंतो.
ड. कमळात मन लपून राहो.

ii. भगवद्भक्तीने पवित्र झालेले मन पुन्हा मलीन होऊ नये, आणि _______
अ. मनाने विरहव्याकुलतेने रडावे.
ब. पाप आत्मज्ञानाने जळून भस्मसात व्हावे.
क. भगवंताने भक्ताला दर्शन द्यावे.
ड. अज्ञानाचा अंधार दूर व्हावा.

*iii. कवींच्या मते मनातील सर्व इच्छा पूर्ण व्हाव्यात म्हणून _______
अ. सतत परमेश्वराच्या सान्निध्यात राहावे.
ब. सतत परमेश्वराचे नामस्मरण करावे.
क. सतत आत्मबोध घ्यावा.
ड. चारधाम यात्रा करावी.

**उत्तर:** i. कमळातून मधुसेवन करणाऱ्या भुंग्याप्रमाणे सज्जनांच्या पायाशी मन गुंतो.
ii. पाप आत्मज्ञानाने जळून भस्मसात व्हावे.
iii. सतत परमेश्वराचे नामस्मरण करावे.

**कृ.४. खालील गोष्टींच्या बाबतीत कवी परमेश्वराजवळ कोणती विनंती करतात ते लिहा.**

| गोष्टी | विनंती |
|---|---|
| *i. निश्चय | ___________ |
| *ii. चित्त | ___________ |

SAMPLE CONTENT

*iii. दुराभिमान ________

*iv. मन ________

v. मती ________

**उत्तर:** i. मनाने केलेला निश्चय कधीही ढळू नये, भंग पावू नये.

ii. चित्ताने भगवद्भक्तीपासून विचलित होऊ नये.

iii. मनाला आत्मज्ञानाने आत्मतत्त्वाची प्रचीती यावी आणि सर्व खोटा अहंकार, दुराभिमान गळून जावा.

iv. मनाला संतसंगाचा वियोग कधीही घडू नये, त्याने भगवत्चरित्रात, भगवंताच्या स्मरणातच रमावे, आत्मज्ञान करून घ्यावे व पुन्हा मलीन होऊ नये.

v. मतीतील दोष, मांद्य नाहीसे होवो, बुद्धी सज्जनांनी सांगितलेल्या मार्गाकडे (भक्तिमार्गाकडे) वळो.

## कृती २ – आकलन

**कृ.१. असत्य विधान ओळखा.**

मनाने या गोष्टी कराव्या.

अ. विषयांचा सर्वस्वी स्वीकार करावा.

ब. संतसंगाचा वियोग घडता रडावे.

क. भगवंताच्या स्मरणात रमावे.

ड. आत्मज्ञान करून घ्यावे.

**उत्तर:** विषयांचा सर्वस्वी स्वीकार करावा.

**कृ.२. योग्य जोड्या जुळवा.**

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| i. | भगवंताचे नामस्मरण | अ. | पाप जळून जावे. |
| ii. | भगवंताच्या आश्रयाला येणाऱ्यांवर | ब. | सदा मुखी वसावे. |
| iii. | आत्मज्ञानाच्या प्रकाशात | क. | सज्जनांच्या मार्गाकडे वळावे. |
| iv. | बुद्धीने नेहमी | ड. | त्याची कृपादृष्टी असावी. |

**उत्तर:** (i – ब), (ii – ड), (iii – अ), (iv – क)

**कृ.३. 'दुरित' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.**

**उत्तर:** कवीच्या मते, आत्मबोधामुळे काय जळून भस्मसात होईल?

**कृ.४. खालील ओळींचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.**

*i. न निश्चय कधी ढळो ________

*ii. मति सदुक्तमार्गी वळो ________

**उत्तर:** i. प्रस्तुत ओळीतून कवी मोरोपंत मनाचा भक्तिमार्गाकडे वळण्याचा निश्चय कधीही भंग पावू नये, अशी कामना व्यक्त करतात. सज्जन माणसांच्या सहवासात सत्पुरुषांच्या सद्विचारांच्या श्रवणात मनाने रमावे. सज्जनांच्या पदकमलाजवळ आश्रय मिळावा. त्यांनी सांगितलेल्या मार्गावरून चालावे तरच आत्मोन्नती होईल असे कवी सांगू पाहत आहेत.

ii. प्रस्तुत ओळीतून कवी बुद्धी चांगल्या मार्गाने जावी अशी इच्छा व्यक्त करत आहेत. मनाला सज्जनांचा सहवास लाभू दे, सतत सद्विचारांचे सान्निध्य मिळू दे, बुद्धी सज्जनांनी सांगितलेल्या मार्गावरून चालू दे, अशा प्रकारची मागणी मोरोपंत परमेश्वराजवळ करतात.

## कृती ३ – काव्यसौंदर्य

***कृ.१. 'स्वतत्त्व हृदया कळो; दुराभिमान सारा गळो' या काव्यपंक्तीतील विचारसौंदर्य स्पष्ट करा.**

**उत्तर:** प्रस्तुत ओळ कवी मोरोपंतांच्या 'केकावली' या संग्रहातील 'भरतवाक्य' या पद्यरचनेतील आहे. या केकावल्यांतून कवी मोरोपंत सद्गृहस्थ किंवा सज्जन माणसांच्या संगतीचे व त्यांच्या विचारांच्या सान्निध्याचे महत्त्व सांगू पाहत आहेत.

ही केकावली म्हणजे कवीने मनाला दिलेली शिकवण आहे. मनाने कधीही डगमगू नये, निश्चय भंग पावू देऊ नये, दुष्ट लोकांनी निर्माण केलेल्या विघ्नांची बाधा दूर व्हावी, चित्त भजनापासून ढळू नये, सज्जनांनी सांगितलेल्या मार्गाकडे (भक्तिमार्ग) बुद्धी वळावी असे कवी मनाला आवाहन करत आहे. त्यामुळे, मनाला स्वतत्त्वाची म्हणजे आत्मतत्त्वाची खरी जाणीव होईल. वृथा अहंकार, अभिमान गळून जाईल व ते पवित्र होईल. असे पवित्र, पावन झालेले मन पुन्हा मलीन होऊ नये अशी इच्छा ते व्यक्त करतात. आत्मतत्त्वाचे खरे ज्ञान झाल्यामुळे त्या ज्ञानाच्या प्रकाशात सारे अज्ञान जळून जाईल. मनाकडून कळत-नकळत घडलेले पाप भस्मसात होईल असे कवीला वाटते. या पंडिती काव्यातून सर्वसमावेशक, उद्बोधक अशी शिकवण देणारा विचार स्पष्ट होतो.

**कृ.२. 'कृपा करिशि तू जगत्रयनिवास दासावरी, तशी प्रगट हे निजाश्रितजनां सदा सांवरी।।' या काव्यपंक्तीतील अर्थसौंदर्य स्पष्ट करा.**

**उत्तर:** प्रस्तुत ओळ कवी मोरोपंतांच्या 'केकावली' या संग्रहातील 'भरतवाक्य' या पद्यरचनेतील आहे. या केकावल्यांतून कवी मोरोपंत सद्गृहस्थ किंवा सज्जन माणसांच्या संगतीचे व त्यांच्या विचारांच्या सान्निध्याचे महत्त्व सांगू पाहत आहेत.

SAMPLE CONTENT

केकावलीच्या अंतिम चरणात मोरोपंत भगवंताला आर्ततेने आळवणी करत आहेत, की हे प्रभो, तुझ्या नामावलीचा माझ्या मुखात सदा वास असो, तुझ्या नामस्मरणाने माझ्या सर्व मनोकामना पूर्ण होवोत. हे जगन्नाथा, तिन्ही जगांत निवास करणाऱ्या परमेशा, माझ्यासारख्या दासावर तुझी कृपादृष्टी अखंड राहू दे, तसेच तुझ्या आश्रयाला आलेल्या भक्तजनांवर तू नेहमी अशीच कृपादृष्टी ठेव. अशाप्रकारे प्रस्तुत पंक्तीतून, मोरोपंत भगवंतापाशी सर्वांकरता कृपादृष्टीचे मागणे मागत आहेत.

येथे दासावरी-सावरी या शब्दरचनेतून यमक अलंकार साधल्यामुळे काव्याला गेयता प्राप्त झाली आहे. संस्कृतप्रचुर व आलंकारिक शब्दरचना ही पंडिती काव्याची भाषिक वैशिष्ट्ये या रचनेत आढळतात. ती तत्कालीन मराठी भाषेचे वैभव प्रस्तुत करतात.

## काव्यपंक्तींचे रसग्रहण

*** कृ.१. 'सुसंगती सदा घडो; सुजनवाक्य कानीं पडो;' या ओळींचे रसग्रहण करा.**

**उत्तर:** प्रस्तुत ओळ कवी मोरोपंतांच्या 'केकावली' संग्रहातील 'भरतवाक्य' या रचनेतील आहे. प्रस्तुत केकावलीतून कवी मोरोपंत सद्गृहस्थ किंवा सज्जन माणसांच्या संगतीचे व त्यांच्या विचारांच्या सान्निध्याचे महत्त्व सांगू पाहत आहेत.

मोरोपंतांच्या केकावलीची भाषा संस्कृतप्रचुर, अलंकारयुक्त मराठी शब्दांनी सजलेली आहे. पंडिती काव्याचे हे महत्त्वाचे वैशिष्ट्य तिच्यात आढळते. उदा. सुसंगती, सुजनवाक्य यांसारखे संस्कृतप्रचुर शब्द कवीने कवितेत ठिकठिकाणी पेरले आहेत. घडो-पडो या शब्दांद्वारे यमक अलंकार साधल्यामुळे या काव्यपंक्तीला एक गेयता प्राप्त झाली आहे. यात आर्यावृत्त वापरले गेले आहे. श्लोकांसारखी ओघवती, रसपूर्ण, प्रासादयुक्त भाषा वापरल्यामुळे कविता श्रवणीय वाटते.

'केका' म्हणजे मोराचा टाहो आणि आवली म्हणजे पंक्ती. मोरोपंतांनी स्वत:स 'मोर' कल्पून, ईश्वराला मारलेल्या हाकांना, ईश्वराच्या केलेल्या आळवणीला 'केकावली' असे म्हटले गेले आहे. ज्याप्रमाणे नाटकात शेवटी भरतवाक्य म्हटले जाते त्याप्रमाणे केकावलीच्या उपसंहारातील शेवटच्या पद्यरचनेला 'भरतवाक्य' म्हणतात. प्रस्तुत काव्यपंक्ती (भरतवाक्य) सुभाषित म्हणून प्रसिद्ध आहे. हेही या रचनेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

**कृ.२. 'मुखीं हरि! वसो तुझी कुशलधामनामावली, क्षणांत पुरवील जी सकलकामना मावली।' या काव्यपंक्तींचे रसग्रहण करा.**

**उत्तर:** प्रस्तुत ओळ कवी मोरोपंतांच्या 'केकावली' संग्रहातील 'भरतवाक्य' या रचनेतील आहे. या केकावल्यांतून कवी मोरोपंत सद्गृहस्थ किंवा सज्जन माणसांच्या संगतीचे व त्यांच्या विचारांच्या सान्निध्याचे महत्त्व सांगू पाहत आहेत. कोणत्याही लोभा-मोहाला बळी पडू नये, वृथा अभिमान सोडून भक्तिमार्ग आपलासा करावा आणि भगवद्भक्तीत मन रमवावे, असा आशय या केकावलीतून व्यक्त होतो.

मोरोपंतांच्या प्रस्तुत केकावलीची भाषा संस्कृतप्रचुर, अलंकारयुक्त मराठी शब्दांनी सजलेली आहे. पंडिती काव्याचे हे महत्त्वाचे वैशिष्ट्य तिच्यात आढळते. सकलकामना, कुशलधामनामावली यांसारखे संस्कृतप्रचुर शब्द कवीने कवितेत ठिकठिकाणी पेरले आहेत. अशा शब्दांतून यमक अलंकार साधल्यामुळे या कवितेला एक गेयता प्राप्त झाली आहे. यात आर्यावृत्त वापरले गेले आहे. श्लोकांसारखी ओघवती, रसपूर्ण, प्रासादयुक्त भाषा वापरल्यामुळे हे काव्य श्रवणीय वाटते.

'केका' म्हणजे मोराचा टाहो आणि आवली म्हणजे पंक्ती. मोरोपंतांनी स्वत:स 'मोर' कल्पून, ईश्वराला मारलेल्या हाकांना, ईश्वराच्या केलेल्या आळवणीला 'केकावली' असे म्हटले गेले आहे. ज्याप्रमाणे नाटकात शेवटी भरतवाक्य म्हटले जाते त्याप्रमाणे केकावलीच्या उपसंहारातील शेवटच्या पद्यरचनेला 'भरतवाक्य' म्हणतात. हेही या रचनेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

## कवितेवर आधारित कृती

***कृ.१. सत्प्रवृत्त व्यक्तीची तुम्हांला जाणवलेली वैशिष्ट्ये तुमच्या शब्दांत लिहा.**

**उत्तर:** सत्प्रवृत्त व्यक्ती ही 'बोले तैसा चाले' या सुवचनावर आचरण करणारी असते. निरपेक्ष, नि:स्वार्थी वृत्तीने जगणारी ही व्यक्ती परोपकारी असते. तिला वृथा अहंकार नसतो. ती सदा नम्र असते. पैसा, पद, प्रतिष्ठा, मान, सन्मानाने ती हुरळून जात नाही. इतरांचा दुस्वास करत नाही. तिचे बोलणे व वागणे सकारात्मक असते. राग, लोभ, मत्सर, गर्व यांसारख्या विकारांची तिला बाधा होत नाही.

अशाप्रकारे, सत्प्रवृत्त माणसाचे व्यक्तिमत्व संतुलित व आदर्शयुक्त असते.

SAMPLE CONTENT

***कृ.२. वाईट गोष्टींचा मोह टाळण्यासाठी तुम्ही कोणते उपाय सुचवाल ते लिहा.**

**उत्तर:** वाईट गोष्टींचा मोह टाळणे ही कठीण गोष्ट असते कारण वाईट गोष्टींचे बाह्य रूप हवेहवेसे, मनाला सुखावणारे असते; पण तिचे आपल्यावर होणारे दीर्घकालीन परिणाम वाईट असतात, म्हणून वाईट गोष्टींचा मोह टाळण्यासाठी दुर्जनांची संगत टाळणे आणि सज्जनांच्या संगतीचा आग्रह धरणे गरजेचे आहे. मनाने कोणत्याही लोभा-मोहाला बळी पडू नये, म्हणून सज्जनांनी सांगितलेल्या मार्गाचा अवलंब करणे आवश्यक आहे. चांगल्या विचारांचे चिंतन केल्यास सत्कर्म करण्याची वृत्ती निर्माण होते. वाईट गोष्टींचा मोह आपोआपच नष्ट होतो.

**कृ.३. 'सुसंगतीचे महत्त्व' या विषयावर थोडक्यात लिहा.**

**उत्तर:** मोरोपंतांच्या केकावलीतील 'सुसंगती सदा घडो' ही ओळ सुभाषित म्हणून सुप्रसिद्ध आहे. या ओळीतून कविवर्य संगतीचे आपल्या आयुष्यातील स्थान व महत्त्व विशद करत आहेत. माणसाचे व्यक्तिमत्त्व हे त्याच्या संगतीवरून ठरते, असे म्हटले जाते. जगात, आपल्या मित्रमंडळींत, परिवारातील लोकांत वावरताना बऱ्यावाईट, गुणदोषांनी युक्त अशी अनेकविध माणसे आपल्याला भेटत असतात. हा सहवास 'सु' म्हणजे उत्तम, चांगला असेल, तर आपला विकास होतो आणि वाईट गुणांच्या, विचारांच्या सहवासात आपण राहिलो तर ते अवगुण, वाईट सवयी, दुष्ट प्रवृत्ती चटकन आत्मसात होऊ शकतात. त्याचा वाईट परिणाम आपल्या व्यक्तिमत्त्वावर घडून येतो.

एक प्रसिद्ध गोष्ट आहे, की दोन पोपट दोन वेगवेगळ्या पिंजऱ्यात विकण्यासाठी ठेवलेले असतात. एक पिंजरा एक कसाई घेऊन जातो, तर दुसरा पिंजरा एका सद्गृहस्थाच्या घरी नेला जातो. कसायाकडे असलेला पोपट शिव्या शिकतो, तर सद्गृहस्थाकडे असलेला पोपट मधुरवाणीने आलेल्या गेलेल्यांचे स्वागत करतो, श्लोक म्हणतो. या उदाहरणावरूनही आपल्याला हे कळते, की चांगल्या संगतीचा परिणाम चांगला, तर वाईट संगतीचा परिणाम वाईट होतो.

आपण चांगल्या लोकांच्या, उच्च विचारांच्या, चांगल्या पुस्तकांच्या सान्निध्यात, सहवासात राहिल्यामुळे आपल्यातही चांगल्या विचारांची, सद्गुणांची, मूल्यांची रुजवण होते, प्रगल्भता येते. जीवन चांगल्या पद्धतीने जगण्याची प्रेरणा मिळते. आपल्या वर्तनात सुधारणा होते. सद्वर्तनी मनुष्याच्या हातून सत्कर्मेच घडतात. सत्कर्मांचा परिपाक म्हणून जीवन चारित्र्यसंपन्न, आदर्श बनते.

म्हणून, सुसंगती नेहमी घडावी, अशी इच्छा प्रत्येक व्यक्तीने मनी बाळगायला हवी.

**कृ.४. तुमच्या मते, आत्मबोध म्हणजे काय? आत्मबोध झाल्यामुळे काय घडेल, तुम्हांला वाटते?**

**उत्तर:** आत्मबोध म्हणजे स्वतत्त्वाची जाणीव. स्वत:ची, आत्मतत्त्वाची ओळख करून घेणे म्हणजे आत्मबोध असे मला वाटते. आजच्या धकाधकीच्या आयुष्यात आपण इतके व्यस्त जीवन जगत असतो, की पैसा, शिक्षण, नोकरी, पद, प्रतिष्ठा मिळवण्याच्या नादात 'स्व' ची ओळख करून घ्यायला आपल्याला फुरसत नसते. स्वत:ची सुख-दु:खे, आवडी-निवडी यांकडे दुर्लक्ष करून एकतर आपण यंत्रवत जीवन जगतो किंवा 'मी' म्हणजेच सर्वकाही असे समजून स्वमग्न राहतो किंवा स्वत:तच रममाण होतो आपण! पण, खरा 'आत्मबोध' करून घेण्यासाठी गरज असते ती स्वत:तील 'मनुष्यत्व' जागवण्याची. स्वत:तील देवत्व जागृत करण्याची. सद्विचार, सद्वर्तन व सत्कर्म करण्याची. माणूस म्हणून जगताना आपल्यातील संवेदनशीलता जपत माणसाच्या विविध भावभावना, विकार, गुण-दोष समजून घेता आले पाहिजेत. सौंदर्य, सत्ता, पद, संपत्ती यांसारख्या बाह्य भौतिक गोष्टींचा गर्व करता कामा नये. आंतरिक गुणांचा विकास झाला पाहिजे. कृतज्ञता, दया, क्षमा, करुणा, शील, सत्य, अहिंसा, मानवता यांसारख्या मानवी मूल्यांचे संवर्धन व विकास झाला पाहिजे.

मी दीन-दुबळा नाही किंवा मी म्हणजेच सर्वोत्तम नाही याची जाणीव झाली तर जगातील असत्य, हिंसा, दंभ दुष्प्रवृत्तींचा नाश होईल. जगात शांती चिरकाल टिकेल. आदर्श मानव घडेल, असे मला वाटते.

## भाषाभ्यास विभाग

### अ. व्याकरण घटकांवर आधारित कृती

**कृ.१. i. 'सु' उपसर्ग लावून योग्य शब्द तयार करा.**

**उत्तर:** सुसंगती, सुजन, सुविचार, सुपरिचय, सुस्वभाव, सुमधुर, सुलक्षणा, सुमती

**ii. 'कु' उपसर्ग लावून योग्य शब्द तयार करा.**

**उत्तर:** कुजन, कुवृत्ती, कुविचार, कुकर्म, कुसंगती, कुमती, कुदृष्टी

**iii. 'स्व' उपसर्ग लावून योग्य शब्द तयार करा.**

**उत्तर:** स्वराज्य, स्वतत्त्व, स्वभाव, स्वमती, स्वरूप, स्वपरिचय, स्वहस्ताक्षर

SAMPLE CONTENT

**iv. 'निज' उपसर्ग लावून योग्य शब्द तयार करा.**

**उत्तर:** निजरूप, निजधन, निजधाम

**कृ.२. खालील शब्दांचे सामान्यरूप लिहा.**

i. वियोग  ii. हृदय
iii. क्षण

**उत्तर:** i. वियोगा  ii. हृदया
iii. क्षणा

## आ. भाषिक घटकांवर आधारित कृती

**कृ.१. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

i. कमळ  ii. वियोग
iii. चित्त  iv. दुरित
v. धाम  vi. कामना
vii. निश्चय

**उत्तर:** i. सरोज, पद्म, पंकज
ii. विरह
iii. मन, मानस
iv. पाप
v. निवास, गृह, आलय, सदन
vi. इच्छा, मनीषा, आकांक्षा
vii. निर्धार

**कृ.२. विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या जुळवा.**

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| i. | कुजन | अ. | आवड |
| ii. | नावड | ब. | स्वामी |
| iii. | कृपा | क. | सुजन |
| iv. | दास | ड. | अवकृपा |

**उत्तर:** (i – क), (ii – अ), (iii – ड), (iv – ब)

**कृ.३. खालील शब्दांत लपलेले शब्द शोधून लिहा.**

i. कुशलधामनामावली  ii. सकलकामना
iii. जगत्रयनिवास

**उत्तर:** i. कुशल, धाम, नामावली, कुश, कुल, शव, लव, धाव, नाश, नाल, नाम, नाव, माल, वश
ii. सकल, कामना, सल, सकाम, कस, सम, कल, लस, कास, काक, काल, काम, काना, मस, मका, मना, नाम, नाका, नाल, नाक
iii. जग, निवास, जय, गज, गय, गवा, वास, सय, सत्र

**कृ.४. खालील शब्दांतील अचूक शब्द लिहा.**

i. सदंघ्रीकमळी, सदंघ्रिकम्रळि, संदघ्रीकमळी, सदंघ्रिकमळी
ii. स्वतत्त्व, स्वतत्व, स्वत्वत्व, सतत्त्व

**उत्तर:** i. सदंघ्रिकमळी  ii. स्वतत्त्व

**कृ.५. खालील वाक्यांत योग्य ठिकाणी विरामचिन्हांचा वापर करून वाक्ये पुन्हा लिहा.**

i. आमच्या वर्गशिक्षिका म्हणाल्या संदीप थोडा सराव केलास तर तुझं अक्षर नक्की सुधारेल.
ii. तुमची ट्रेन किती वाजता येणार आहे.

**उत्तर:** i. आमच्या वर्गशिक्षिका म्हणाल्या, "संदीप, थोडा सराव केलास, तर तुझं अक्षर नक्की सुधारेल."
ii. तुमची ट्रेन किती वाजता येणार आहे?

**कृ.६. खालील शब्द अकारविल्ह्यांनुसार लिहा.**

क्षण, कलंक, सुसंगत, दुरित

**उत्तर:** कलंक, दुरित, सुसंगत, क्षण

**[सूचना:** या कवितेच्या सुलभ आकलनाकरता शेजारी दिलेला **Q. R. Code** स्कॅन करून कवितेचा भावार्थ कथन करणारा व्हिडिओ पाहा.**]**

SAMPLE CONTENT

# इयत्ता दहावी




**AVAILABLE SUBJECTS:**

- My English Notes
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- मराठी कुमारभारती
- गणित भाग - I
- गणित भाग - II
- विज्ञान आणि तंत्रज्ञान - १
- विज्ञान आणि तंत्रज्ञान - २
- इतिहास व राज्यशास्त्र
- भूगोल

BUY NOW

## ठळक वैशिष्ट्ये:

- इयत्ता दहावीच्या प्रश्नपत्रिका आराखड्याचे व गुणविभागणीचे सविस्तर स्पष्टीकरण
- सर्व विषयांमध्ये सर्व पाठाधारित प्रश्नांचा समावेश
- सर्व विषयांच्या सर्व संकल्पनांचे सविस्तर स्पष्टीकरण
- स्वयंमूल्यमापनासाठी दोन नमुना प्रश्नपत्रिकांचा समावेश
- प्रत्येक पुस्तकात विद्यार्थ्यांना विषयाचे सखोल ज्ञान देणाऱ्या व्हिडिओजचे Q.R.Codes समाविष्ट

Target Publications Pvt. Ltd.

88799 39712 / 13 / 14 / 15
mail@targetpublications.org
www.targetpublications.org